शिक्षण / आरोग्य / रोजगार / कला /क्रीडा / महिला सक्षमीकरण

# रयत विद्यार्थी विचार मंच

संस्थापक / अध्यक्ष : धम्मराज साळवे


## ➢ कार्यअहवाल : सन २०१९

देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाल्यानंतर देखील आजही एक मोठा वर्ग शिक्षणापासून वंचित आहे.अनेक विद्यार्थी आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण अर्ध्यावर सोडतात. मराठवाड्यातील एका विद्यार्थीनीने बस पास साठी २५० रूपये नाहीत म्हणून आत्महत्या केली. अनेक विद्यार्थी आपल्या शिक्षणाचे ओझे पालकांवर नको म्हणून शेतकरी कुटुंबातील विद्यार्थी अर्ध्यावर शिक्षण सोडतात किंवा आत्महत्या करतात.एवढ्या शुल्लक कारणांसाठी विद्यार्थ्यांनी अर्ध्यावर शिक्षण सोडणे किंवा आत्महत्या करणे हे अतिशय दुर्देवी आहे.आपल्या अवती भोवती अनेक गरजु, होतकरू विद्यार्थी शिक्षणापासुन वंचित राहतात त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणुन शैक्षणिक प्रगल्भ करणे हा देशाच्या विकासाचा पाया आहे. आपण सर्व विद्यार्थी मिळुन आपल्यातील गरजु व होतकरू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देऊन त्यांना सक्षम करूया. याकरिता रयत विद्यार्थी विचार मंच कार्य करत आहे. आपणही या संकल्पनेत सहभाग घेऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मदतीचा हात पुढे करूया..

- **धम्मराज नवनाथ साळवे**

  **संस्थापक / अध्यक्ष**




चला बनू भविष्य जगाचे...
art_bhagyashree








## दिनांक ०१ जानेवारी २०१९
## दैनिक प्रभात वर्धापन दिन

दैनिक_प्रभात च्या 88 व्या वर्धापन दिनानिमित्त व्यवस्थापकीय संचालक आनंदजी गांधी यांना व प्रभात टीमला शुभेच्छा देताना रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक अध्यक्ष- धम्मराज साळवे ,कार्याध्यक्ष अंजना गायकवाड, महासचिव संतोष शिंदे,सहसचिव मेघा आठवले





**दिनांक ०२ जानेवारी २०१९**

**कष्टकरी कामगारांच्या मुलांची विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती जमा करण्यात यावी**

मागील 3 वर्षांपासून कष्टकरी कामगारांच्या मुलांची विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती अद्याप जमा झाली नाही तात्काळ खात्यात शिष्यवृत्ती जमा करण्यात यावी यासंदर्भात निवेदन देताना रयत विद्यार्थी विचार मंच पदाधिकारी.








## दिनांक ०३ जानेवारी २०१९
## सावित्रीमाई फुले जयंती

सावित्रीमाई फुले यांना जयंतीनिम्मित रयत विद्यार्थी विचार मंच च्या वतीने अभिवादन करताना संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे महासचिव संतोष शिंदे,कार्यध्यक्ष अंजना गायकवाड,सहसचिव भाग्यश्री आखाडे,सहसचिव मेघा आठवले,पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष रोहित कांबळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.





## दिनांक ०३ जानेवारी २०१९
## विज्ञान प्रदर्शन

उर्दू माध्यमिक विद्यालय,लांडेवाडी या ठिकाणी आयोजित विज्ञान प्रदर्शन दरम्यान उत्तम प्रकल्पास पारितोषिक वितरण करत ,विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक/अध्यक्ष- धम्मराज साळवे,पिंपरी चिंचवड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष-अकिलभाई मुजावर, सचिव शफीउल्ला काझी ,मुख्याध्यापक गायकवाड सर,महासचिव संतोष शिंदे..




## दिनांक १८ जानेवारी २०१९

## भोसरी येथे नव्याने बांधण्यात आलेले हॉस्पिटल खासगी संस्थेस चालवण्यास देण्यास विरोध

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने भोसरी येथे नव्याने बांधण्यात आलेले हॉस्पिटल खासगी संस्थेस देण्याचा निर्णय सर्वसाधारण सभेमध्ये हा प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवण्यात आला आहे. महापालिकेच्या या लोकविरोधी निर्णयाला विरोध करण्यासाठी नागरी हक्क सुरक्षा समिती आणि इतर समविचारी पक्ष, सामाजिक संघटना यांच्या वतीने पिंपरीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात धरणे आणि निदर्शने आंदोलन करण्यात आले.



pimpri : भोसरी हॉस्पिटल खासगी संस्थेस देण्यास विरोध

नागरी हक्क सुरक्षा समिती आणि इतर समविचारी पक्ष, सामाजिक संघटना यांच्यातर्फे निदर्शने

By Navneet MPC News — On जानेवारी 19, 2019

Share

एमपीसी न्यूज -पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने भोसरी येथे नव्याने बांधण्यात आलेले हॉस्पिटल खासगी संस्थेस देण्याचा निर्णय सर्वसाधारण सभेमध्ये हा प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवण्यात आला आहे. महापालिकेच्या या लोकविरोधी निर्णयाला विरोध करण्यासाठी नागरी हक्क सुरक्षा समिती आणि इतर समविचारी पक्ष, सामाजिक संघटना यांच्या वतीने पिंपरीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात धरणे आणि निदर्शने आंदोलन करण्यात आले.

भोसरीतील हॉस्पिटल खासगी संस्थेस चालविण्यास देण्याचा निर्णयाने शहरातील सर्वसामान्य नागरिकांना स्वस्त दरात आणि सहज वैद्यकीय सेवा मिळणे अशक्य होईल.

या विरोधात शेतकरी कामगार पक्ष, नागरी हक्क सुरक्षा समिती, स्वराज अभियान आणि इतर सामाजिक संघटना, मानव कांबळे, प्रदीप पवार, गिरीश वाघमारे, निरजकुमार कडू, हरीश मोरे, नितीन बनसोडे, छायावती देसले, आनंदा कुदळे, सुरेश गायकवाड, वैजनाथ शिरसाट, धम्मराज साळवे, संतोष शिंदे, वंदना गायकवाड, दत्ता भोसले, राजेंद्र वाघचौरे, प्रताप गुरव, गणेश दराडे, अपर्णा दराडे सतीश काळे आदी उपस्थित होते.

## दिनांक १९ जानेवारी २०१९

पिंपरी चिंचवड शहरातील भोसरी या ठिकाणी महानगरपालिकेच्या वतीने नव्याने बांधण्यात आलेले हॉस्पिटल खाजगी संस्थेस चालवण्यास देऊ नये याकरिता आंदोलन करण्यात आले होते.











**दिनांक २० जानेवारी २०१९ कार्याध्यक्ष अंजना गायकवाड वाढदिवस सोहळा**

अंजनाताई गायकवाड यांच्या वाढदिवसानिम्मित काल दापोडी येथील सरस्वती अनाथ आश्रम येथे रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने शैक्षणिक साहित्य व फळे वाटप करण्यात आली.





## दिनांक २१ जानेवारी २०१९
## संस्थेला आर्थिक सहाय्य

रिपब्लीकन सेना  मुळशी तालुका अध्यक्ष  नितीनभाऊ ओव्हाळ यांनी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेला शैक्षणिक साहित्य व २१०० रुपये चेकच्या स्वरूपात शैक्षणिक सहाय्य केले.संस्थेच्या वतीने  त्यांचे खुप खूप आभार.





**दिनांक २२ जानेवारी २०१९**
**मावळातील विद्यार्थ्यांच्या वाहतुकीच्या अडचणी**

मावळ विभागातील १५ खेडेगावामधून जवळपास १५० च्या आसपास विद्यार्थी कामशेत मध्ये शिक्षणासाठी येतात.या विद्यार्थ्यांना खाजगी वाहना शिवाय शाळेत  यायला दुसरा पर्याय नाही.परंतु खाजगी वाहने यांना सुद्धा पोलिसांनी बंदी घातली आहे.त्यामुळे  विद्यार्थ्यांना चालत शाळेत जाण्याची वेळ आली आहे.त्यामुळे रयत विद्यार्थी विचार मंच चे मावळ प्रमुख अतुल वाघमारे व अजय यादव यांनी विद्यार्थ्यांशी जाऊन त्यांच्या समस्या जाणून  घेतल्या व शाळेच्या प्राचार्याची भेट घेऊन त्यांना ही या संदर्भात विचारपूस केली.लवकरच एसटी महामंडळ प्रमुख यांना भेटून विद्यार्थ्यांना बसची सुविधा उपलब्ध करून देणार..






## दिनांक २६ जानेवारी २०१९
## प्रजासत्ताक दिन साजरा

रयत विद्यार्थी विचार मंच(महाराष्ट्र राज्य) संपर्क कार्यलयासमोर आज ध्वजारोहण करण्यात आले प्रभारी अध्यक्ष संतोष शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी राष्ट्रगीत व तिरंग्याला सलामी देऊन संविधानाच्या प्रसातविकेचे वाचन करण्यात आले.

लोकमत

महत्त्वाचे

## रयत विद्यार्थी मंचातर्फे प्रजासत्ताक दिन साजरा

**पिंपरी :** रयत विद्यार्थी विचार मंचाच्या पिंपरी येथील जनसंपर्क कार्यालयासमोर प्रभारी अध्यक्ष संतोष शिंदे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. या वेळी राष्ट्रध्वजास सलामी देऊन संविधान प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. या वेळी मंचाचे अध्यक्ष धम्मराज साळवे, महासचिव संतोष शिंदे, कार्यध्यक्ष अंजना गायकवाड, उपाध्यक्ष संदेश पिसाळ, सचिव नीरज भालेराव, सहसचिव मेघा आठवले, सहसचिव भाग्यश्री आखाडे, शहराध्यक्ष रोहित कांबळे, शहर सचिव समाधान गायकवाड, सदस्य प्रतीक वाघमारे आदी उपस्थित होते. प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध कार्यक्रम घेण्यात आले. या वेळी विद्यार्थ्यांसह पालकही उपस्थित होते.

Hello Pimpri Chinchwad
Page No. 7 Jan 28, 2019
Powered by: erelego.com





## दिनांक २७ जानेवारी २०१९
## PSI संदेश इगळे संप्रर्क कार्यालयाला भेट

आमचे मित्र सिंघम PSI संदेश इगळे यांनी रयत विद्यार्थी विचार मंच संपर्क कार्यालयास सदिच्छा भेट देऊन संस्थेचे कामकाज व संकल्पना जाणून घेतली यावेळी भारतीय संविधान ग्रंथ भेट देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला





**दिनांक २७ जानेवारी २०१९**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या द्वितीय पत्नी सविता उर्फ माईसाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या  वतीने अभिवादन अभिवादन करताना संस्थापक धम्मराज साळवे व महासचिव संतोष शिंदे








**दिनांक २८ जानेवारी २०१९**

**आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांची भेट**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू मा. आदरणीय प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांच्याशी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे पदाधिकारी यांची ग्रेट भेट



**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, गृहशाखा पुणे**

**विधानभवन आवार, जुने बरॅक १ ला मजला पुणे ४११००१**

**दुरध्वनी क्रमांक व फॅक्स क्रमांक ०२०-२६१३००९७ ईमेल.homebranchpune@gmail.com**

जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे
( गृह शाखा,)
जा.क्र.पगक/कावि/ /२०१९
दिनांक - ९ /०१/२०१९

प्रति,
मा.अवर सचिव,
मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
मंत्रालय, मुंबई-३२

विषय :- मृत शिवाजी परदेशीच्या मुलांची जबाबदारी शासनाने घेणेबाबत व त्या मुलीच्या नोकरीची हमी घेणेबाबत.

संदर्भ :- रयत विद्यार्थी विचार मंच, गांधीनगर, पिंपरी पुणे -१८ यांचे दि.०८/१०/२०१८ रोजीचे पत्र प्राप्त दिनांक २०/१०/२०१८

महोदय,

उपरोक्त विषयाकामी संदर्भीय पत्र/निवेदन या कार्यालयास प्राप्त झालेले आहे. सदर विषयाबाबत या कार्यालयाकडून कार्यवाही होणे अपेक्षित नसलेने, सदर निवेदनाबाबत शासनस्तरावरुन आवश्यक कार्यवाही होणेकामी आपणाकडे सविनय सादर करण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

( हेमंत निकम )
विशेष कार्यकारी दंडाधिकारी,पुणे
जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे

प्रत :- रयत विद्यार्थी विचार मंच, गांधीनगर, पिंपरी पुणे -१८ यांना माहितीसाठी.

## दिनांक २९ जानेवारी २०१९

पुणे येथे होर्डिंग कोसळून शिवाजी परदेशी यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता.त्यामुळे त्यांची मुले अनाथ झाली त्यांना कसलाही आधार नाही.म्हणून शासनाने त्या मुलांच्या आयुष्याची पूर्ण जबाबदारी शासनाने घ्यावी.यासाठी रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले होते.जिल्हाधिकारी यांच्याकडून त्यावर अपेक्षित कार्यवाही सुरु केल्याचे पत्राद्वारे कळवले.



## दिनांक ०२ फेब्रुवारी २०१९
## कामगार नेते जॉर्ज फर्नांडीस श्रद्धांजली सभा

नागरी हक्क सुरक्षा समिती व स्वराज अभियान आयोजित कामगार नेते जॉर्ज फर्नांडीस श्रद्धांजली सभा कार्यक्रमात रयत विद्यार्थी विचार मंच च्या वतीने श्रद्धांजली पर मनोगत व्यक्त करताना संस्थापक/अध्यक्ष धम्मराज धम्मराज साळवे सर...





## दिनांक ०७ फेब्रुवारी २०१९
## माता रमाई आंबेडकर जयंती

ध्यास ग्रुप व रयत विद्यार्थी विचार मंच आयोजित माता रमाई आंबेडकर जयंतीनिम्मित अभिवादन करून प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले..





**दिनांक १७ फेब्रुवारी २०१९**

पुरस्कार समारंभासाठी बीड या ठिकाणी गेल्यावर रयत विद्यार्थी विचार मंच महाराष्ट्र राज्य टीमचे बीड येथील विद्यार्थी मित्र सामाजिक कार्यकर्ते यांच्याकडून स्वागत करण्यात आले.






**दिनांक १७ फेब्रुवारी २०१९**

**स्वाभिमानी प्रबोधिनी समाजभूषण पुरस्कार**

रयत विद्यार्थी विचार मंच (महाराष्ट्र राज्य) च्या कार्याची दखल घेत स्वाभिमानी प्रबोधिनी समाजभूषण पुरस्कार पोलिस उपअधीक्षक मा. सुधिर खिरडकर ,बालहक्क आयोग अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) मा. प्रवीण घुगे यांच्या हस्ते स्वीकार करताना संस्थापक अध्यक्ष- धम्मराज साळवे ,कार्याध्यक्ष अंजना गायकवाड ,महासचिव संतोष शिंदे.







## दिनांक १९ फेब्रुवारी २०१९
## छत्रपती शिवाजी महाराज जयंती

रयत विद्यार्थी विचार मंच महाराष्ट्र राज्य संस्थेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांना संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे व कार्यध्यक्ष अंजनाताई गायकवाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले.यावेळी महासचिव संतोष शिंदे,सचिव नीरज भालेराव,सहसचिव मेघा आठवले,पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष रोहित कांबळे उपस्थित होते.



**दिनांक २० फेब्रुवारी २०१९**

सामाजिक कार्यकर्ते व भीम आर्मी चे पिंपरी चिंचवड उपाध्यक्ष सुमित भाऊ वाघमारे यांच्या वतीने वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून गरजू विद्यार्थ्यांना सहकार्य व्हावे या भावनेने रयत विद्यार्थी विचार मंचकडे शैक्षणिक साहित्य देण्यात आले.




**दिनांक २१ फेब्रुवारी २०१९**
**१२ वि च्या परीक्षार्थी विद्यार्थ्यांना निशुल्क सेवा देणेबाबत**

आजपासून १२ ची परीक्षा चालू होतं आहेत.अनेक विद्यार्थ्यांचे परीक्षा केंद्र हे घरापासून फार दूर असतात. अनेक वेळा विद्यार्थ्यांना परीक्षेला जायला उशीर होतो त्यामुळे विद्यार्थ्यांचे हाल होऊ नये म्हणून परीक्षा संपेपर्यंत विद्यार्थ्यांना मोफत सुविधा द्यावी यासाठी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने सामाजिक बांधीलकी जपणाऱ्या महामानव एक्सप्रेस रिक्षा संघटनेचे अध्यक्ष गिरीष साबळे यांना संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे,महासचिव संतोष शिंदे व मावळ पदाधिकारी अजय यादव यांच्या वतीने निवेदन देण्यात आले.यावेळी सर्व संघटनेच्या वतीने विद्यार्थ्यांना निशुल्क सेवा देण्याचे त्यांनी मान्य केले.










## दिनांक २७ फेब्रुवारी २०१९
## दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

खराळवाडी उर्दू माध्यमिक विद्यालय पिंपरी येथे १० वि च्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभानिम्मित रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे सर मार्गदर्शन करताना.





**दिनांक २६ मार्च २०१९**

**क्रांतिसूर्य महात्मा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर**
**यांच्या जयंतीनिमित्त विशेष शिष्यवृत्ती योजना राबवणेबाबत.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकाच्या वतीने विशेष तरतूद करून सर्व जातीधर्मातील विद्यार्थी जे गरीब आहेत परंतु हुशार आहेत व उच्चशिक्षण घेऊ इच्छितात.परंतु आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण घेता येत नाही अश्या विद्यार्थ्यांना ती शिष्यवृत्ती लागू करावी.आणि हेच खरे बाबासाहेब व महात्मा फुले यांना अभिवादन ठरेल अश्या आशयाचे निवेदन आज रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने आयुक्त/ व महापौर यांना निवेदन देण्यात आले .यावेळी संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे महासचिव संतोष शिंदे संघटक रोहित कांबळे उपस्थित होते.



पुढारी

# ‘फुले व आंबेडकर जयंतीनिमित्त शिष्यवृत्ती योजना राबवा’

**पिंपरी :** महात्मा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित विशेष शिष्यवृत्ती योजना राबवा, अशी मागणी रयत विद्यार्थी मंचच्या वतीने करण्यात आली. आयुक्त श्रावण हर्डीकर यांना याबाबत निवेदन दिले आहे. याबाबत त्वरित निर्णय न घेतल्यास आंदोलन करणार असल्याचा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला.

निवेदनात नमूद केले आहे की, महात्मा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सांस्कृतिक जयंती महोत्सव साजरा केला जातो. जयंती महोत्सवाला लाखो रुपये खर्च केले जातात. या जयंती महोत्सव कार्यक्रमात अतिरिक्त अनावश्यक खर्च केला जात आहे. हा महोत्सव होणे गरजेचेच आहे. मात्र, अनावश्यक खर्च टाळून अथवा विशेष तरतूद करून क्रांतिसूर्य महात्मा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेष शिष्यवृत्ती योजना तयार करण्यात यावी. त्यामधून दरवर्षी उच्चशिक्षण घेणाऱ्या जातीतील १० व कमीत कमी ५ विद्यार्थ्यांना ती शिष्यवृत्ती देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. संघटनेचे अध्यक्ष धम्मराज साळवे, संतोष शिंदे, राज्य संघटक रोहित कांबळे आदी या वेळी उपस्थित होते.

My Pimpri Edition
27 Mar, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com



## दिनांक ०९ एप्रिल २०१९

## होतकरू विद्यार्थ्याला शैक्षणिक साहित्याची मदत

एस.एस अजमेरा महाविद्यालयात १२ वि कॉमर्स चे शिक्षण घेणाऱ्या राहुल हरीश कागडा या विद्यार्थ्याला पुसतक व वह्या व अन्य शैक्षणिक साहित्य देण्यात आले.


भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर






पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्वच्छ भारत









## दिनांक ०१ मे २०१९
## महाराष्ट्र दिन व कामगार दिन साजरा

०१ मे महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त रयत विद्यार्थी विचार मंच महाराष्ट्र राज्य संस्थेच्या वतीने कामगार नेते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून पिंपरी चिंचवड शहरातील सफाई कामगार विभाग,वाहतूक पोलीस विभाग,पोलीस विभाग,शहर सुरक्षा विभाग या विविध क्षेत्रात काम करून या देशाच्या प्रगतीत मोलाचे योगदान देणाऱ्या कर्मचाऱ्यांचा गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला व मिठाई वाटप करण्यात आली.

यावेळी संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे सर,महासचिव संतोष शिंदे,कार्यध्यक्ष अंजना गायकवाड,राज्य संघटक रोहित कांबळे,सचिव नीरज भालेराव,पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष महेश गायकवाड,शहर सचिव समाधान गायकवाड उपस्थित होते.



दिनांक ०६ मे २०१९

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे सर यांचा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त एकता मित्र मंडळ पिंपरी यांच्या वतीने भारतीय संविधान देऊन सत्कार करण्यात आला...



## दिनांक ०९ मे २०१९
## कर्मवीर भाऊराव पाटील स्मृतीदिन

ररयत विद्यार्थी विचार मंच महाराष्ट्र राज्यच्या संस्थेच्या वतीने कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या स्मृतीदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.अभिवादन करताना संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे सर,महासचिव संतोष शिंदे,राज्य संघटक रोहित कांबळे,सचिव निरज भालेराव ऊपस्थित होते.

पुढारी

# शालेय साहित्य न दिल्यास अर्धनग्न मोर्चा

**पिंपरी : प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षास प्रारंभ होऊनही शालेय साहित्य मिळालेले नाही. साहित्य त्वरित न दिल्यास महापालिकेवर अर्धनग्न मोर्चा काढू, असा इशारा रयत विद्यार्थी विचार मंचने आयुक्तांना निवेदनाद्वारे दिला आहे.

या निवेदनात नमूद करण्यात आले की, महापालिकेचे २०७ बालवाडी, १३० प्राथमिक आणि १८ माध्यमिक शाळा कार्यरत आहेत. बालवाडी ते माध्यमिक द्याळेत सुमारे ५५ हजार विद्यार्थी शिकत आहेत. महापालिकेची बिरुदावली मिरवणाऱ्या पिंपरी-चिंचवड महापालिका शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींना गणवेशाविना शाळेत यावे लागत आहे. महापालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच सर्व विद्यार्थ्यांना वेळेवर शालेय साहित्य मिळालेले नाही.

महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये शालेय साहित्य वाटप त्वरित करावे, अन्यथा रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने बुधवारी (दि. २६) महापालिकेवर विद्यार्थ्यांसह अर्धनग्न मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा धम्मराज साळवे यांनी दिला आहे.

Pimpri Edition
25 Jun, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

## दिनांक २५ जून २०१९

शालेय साहित्यासाठी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचा पिंपरी चिंचवड महापालिकेवर मोर्चा.














रयत विद्यार्थी विचार मंच






## दिनांक २५ जून २०१९

## विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक साहित्यासाठी आंदोलन

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने शालेय साहित्य गणवेश,बुट रेनकोट व डीबीटी रद्द करा या मागण्यांसाठी आज पिंपरी चिंचवड महानगरपालिकेवर संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे सर यांच्या नेतृत्वाखाली अर्धनग्न धडक मोर्चा काढण्यात आला.यावेळी क्रांतीसुर्य महात्मा फुले विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व राजर्षी शाहु महाराज यांच्या पुतळयाला पुष्पहार अर्पण करून महानगरपालिकेच्या गेटवर ठिय्या आंदोलन केले..

आंदोलनाची दखल घेत शिक्षण विभागाकडुन पराग मुंडे यांनी भेट घेतली व विद्यार्थांच्या मागण्या ऐकुन त्यांनी आशवासन दिले की येत्या आठ दिवसात शालेय साहित्य वाटप केले जाईल.व या संदर्भात आयुक्तांकडे मागण्या मांडल्या जातील असे लेखी आश्वासन देण्यात आले.






## दिनांक २६ जून २०१९

## छत्रपती शाहु महाराज यांची जयंती साजरी

शालेय साहित्य मोर्चा यशस्वी झाल्यानंतर रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने छत्रपती लोककल्याणकारी राजे शाहु महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी संस्थापक/अधयक्ष धम्मराज साळवे व सहसचिव भाग्यश्री आखाडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले.

पुढारी



शालेय साहित्य वेळेत मिळावे यासाठी रयत विद्यार्थी मंचतर्फे महापालिकेसमोर विद्यार्थ्यांचा अर्धनग्न धडक मोर्चा काढण्यात आला.

# पिंपरी-चिंचवड पालिकेवर विद्यार्थ्यांचा अर्धनग्न मोर्चा

**पिंपरी : प्रतिनिधी**

महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना गणवेश, पीटी गणवेश असे विविध साहित्य वेळेवर दिले जाते. मात्र, यंदा शैक्षणिक वर्षास प्रारंभ होऊन आठवडा झाला तरी शालेय साहित्य मिळालेले नाही. महापालिका शाळेतील गोरगरीब विद्यार्थी अद्याप गणवेशापासून वंचित आहेत. याचा निषेध करण्यासाठी रयत विद्यार्थी मंचतर्फे आज (बुधवारी) महापालिकेसमोर विद्यार्थ्यांचा अर्धनग्न धडक मोर्चा काढण्यात आला.

मंचचे अध्यक्ष धम्मराज साळवे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी मोर्चात सहभागी होऊन घोषणा दिल्या. या शहरातील कामगार, कष्टकऱ्यांची मुले महापालिकेच्या बालवाडी, प्राथमिक, माध्यमिक शाळेत शिक्षण घेत आहेत. बालवाडी ते माध्यमिक शाळेत सुमारे ५५ हजार विद्यार्थी शिकत आहेत. त्या सर्व विद्यार्थ्यांना मागील २० वर्षापासून वेळेवर शालेय साहित्य मिळत आहे. यामध्ये गणवेश, पीटी गणवेश असे विविध साहित्य वेळेवर दिले जाते. राजकारणाच्या साठमारीत गतवर्षी विद्यार्थ्यांना वर्षभर शूज मिळालेच नाहीत. आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी सर्व शाळांमध्ये लवकरात लवकर शालेय साहित्य वाटप करावे, तत्काळ निर्णय घ्यावा, अशी मागणी साळवे यांनी यावेळी केली.

Pimpri Edition
27 Jun, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

सकाळ

# साहित्यासाठी विद्यार्थ्यांचा मोर्चा

**पिंपरी, ता. २६ :** शाळा सुरू होऊन आठवडा उलटल्यानंतरही महापालिकेचे विद्यार्थी शालेय साहित्याविनाच आहेत. ते लवकर मिळावे, यासाठी रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने महापालिका भवनासमोर बुधवारी (ता. २६) मोर्चा काढण्यात आला. या वेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. पराग मुंढे यांना निवेदन देण्यात आले.

महापालिका भवनाच्या प्रवेशद्वारासमोर 'आम्हाला वह्या, पुस्तके, दप्तर मिळालेच पाहिजे,' 'गणवेश आमच्या हक्काचा,' 'रद्द करा, डीबीटी रद्द करा,' 'आमचे साहित्य मिळालेच पाहिजे' अशा घोषणा विद्यार्थ्यांनी दिल्या.या वेळी मंचचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे म्हणाले, ''आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या कार्यकाळात पहिल्यांदाच विद्यार्थ्यांना वेळेवर शालेय साहित्य मिळालेले नाही. त्यांच्याकडून शालेय साहित्यासाठी थेट बँकेत रक्कम जमा (डीबीटी) करण्यात येणार आहे. परंतु, तसे केल्यास विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होण्याऐवजी पालकांनाच लाभ होईल. त्यामुळे शाळांमध्ये शालेय साहित्य वाटप करावे.''



पिंपरी : विद्यार्थ्यांनी महापालिकेवर मोर्चा काढला.

Pune, PCMC-Today
27/06/2019 Page No. 7

# नवभारत

# गणवेश के लिए विद्यार्थियों का अर्धनग्न आंदोलन

संवाददाता

**पिंपरी.** गर्मी में स्वेटर, ठंड में रेनकोट बांटने वाले पिंपरी चिंचवड़ मनपा प्रशासन की उदासीनता के चलते स्कूल शुरू होने के सप्ताह भर बाद भी मनपा स्कूली विद्यार्थी गणवेश व स्कूली सामग्रियों से वंचित हैं. इस ओर प्रशासन और सत्तादल भाजपा का ध्यानाकर्षित करने के लिए मनपा स्कूली विद्यार्थियों ने बुधवार को अर्धनग्न होकर आंदोलन किया. मनपा मुख्यालय के बाहर रयत विद्यार्थी विचार मंच के धम्मराज सालवे के नेतृत्व में किये गए इस आंदोलन में संतोष शिंदे, सतीश कदम समेत अन्य कार्यकर्ता व सैकड़ों विद्यार्थी शामिल हुए. मनपा शिक्षा विभाग की ओर से पराग मुंडे द्वारा आठ दिन में गणवेश व दूसरी स्कूली सामग्रियों का वितरण करने का भरोसा दिलाने के बाद यह आंदोलन स्थगित किया गया.



## मनपा प्रशासन की उदासीनता से आक्रोश

मनपा स्कूलों में गरीब व मेहनतकशों के करीबन 55 हजार बच्चे पढाई करते हैं. उन्हें शिक्षा की धारा में शामिल करने के लिए मनपा की ओर से गणवेश, कॉपी- किताबें और अन्य स्कूली सामग्रियां दी जाती हैं. पिछले कुछ सालों से शिक्षा विभाग ने गणवेश व स्कूली सामग्री वितरण की लेटलतीफी की शिकायत को दूर करने की लगातार कोशिश की. मगर इस साल स्कूल शुरू होने के सप्ताह भर बाद भी बच्चों को गणवेश और स्कूली सामग्री नहीं मिल सकी है. मनपा प्रशासन की उदासीनता से लोगों में आक्रोश है.

## प्रशासन की निंदा

**1** आंदोलन का नेतृत्व कर रहे धम्मराज सालवे ने कहा कि, महापौर राहुल जाधव, मनपा आयुक्त श्रवण हार्डिकर, स्थायी समिति अध्यक्ष विलास मडिगेरी, सभागृह नेता एकनाथ पवार और मनपा के सत्तादल भाजपा को गरीब बच्चों की शिक्षा से कोई सरोकार नहीं है.

**2** बच्चों के आंदोलन से सभी ने मुंह फेर लिया. हम सत्तादल और प्रशासन के इस रवैये की कड़ी निंदा करते हैं.

**3** बहरहाल शिक्षा विभाग की ओर से पराग मुंडे ने आंदोलनकारियों को आठ दिन के भीतर इस मसले को हल करने को लेकर आश्वस्त किया.

Navabharat Pune Edition
27 Jun, 2019 Page No. 3

# शालेय साहित्यासाठी आंदोलन



**पिंपरी :** महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य न मिळाल्याच्या निषेधार्थ रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने महापालिकेवर विद्यार्थ्यांचा अर्धनग्न मोर्चा काढण्यात आला.

प्रभात Thu, 27 June 2019
epaper.eprabhat.net/c/40787672

**लोकमत**

## शालेय साहित्य न मिळाल्याने विद्यार्थी-पालक संतप्त

# पालिका प्रशासनाच्या निषेधार्थ विद्यार्थ्यांचे अर्धनग्न आंदोलन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य न मिळाल्याच्या निषेधार्थ बुधवारी महाराष्ट्र राज्य रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने पालिकेवर विद्यार्थ्यांचा अर्धनग्न मोर्चा काढला.

पिंपरी चिंचवड शहर उद्योगनगरी म्हणून आशिया खंडात ओळखले जाते. हे शहर कष्टकरी, कामगार, मजूर वर्गाच्या श्रमावर उभारले आहे. या शहरातील कामगार, कष्टकऱ्यांची मुले पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळेत शिक्षण घेत आहेत. २० वर्षांपासून वेळेवर शालेय साहित्य मिळत आहेत. यामध्ये गणवेश, पीटी गणवेश असे विविध साहित्य वेळेवर दिले जाते. मात्र प्रशासनाच्या भोंगळ कारभारामुळे मागीलवर्षी विद्यार्थ्यांना अनवाणी राहावे लागले होते. यंदा शैक्षणिक वर्ष सुरू होऊन आठवडा उलटला आहे. मात्र तरीही शालेय साहित्य मिळालेले नाही.

डीबीटी योजना राबविल्यास विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होण्याऐवजी पालकांनाच लाभ होईल, कारण सर्व विद्यार्थी हे गोरगरीब, कष्टकरी मजुराची मुले असल्याने डीबीटीचे सर्व अनुदान पालक खर्च करून टाकतील. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना डीबीटी न राबविता पूर्वीप्रमाणे शालेय साहित्य द्यावे, जेणे करुन सर्व विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होईल. रयत विचारमंचाचे धम्मराज साळवे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले.



**मोर्चा :** शालेय साहित्य न मिळाल्याच्या निषेधार्थ प्रशासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी अर्धनग्न होऊन महापालिकेवर मोर्चा काढला.

Hello Pimpri Chinchwad
Page No. 3 Jun 27, 2019
Powered by: erelego.com

### आठ दिवसात शालेय साहित्याचे वाटप करु, शिक्षण विभागाचे आश्वासन

# शालेय साहित्यांसाठी विद्यार्थ्यांचे अर्धनग्न आंदोलन

। पिंपरी चिंचवड/ प्रतिनिधी।

## आयुक्त कपड्यावर अन् आम्ही उघड्यावर; विद्यार्थी विचार मंच

आयुक्त कपड्यावर अन् आम्ही उघड्यावर आमचं साहित्य मिळालंच पाहिजे, साहित्य आमच्या हक्काचं, नाही कुणाच्या बापाचं, रद्द करा, रद्द करा, डीबीटी रद्द करा अशा घोषणा देत स्वत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने बुधवारी महापालिकेसमोर विद्यार्थ्यांचा अर्धनग्न आंदोलन करण्यात आले. येत्या आठ दिवसात शालेय साहित्याचे वाटप करु, असे आश्वासन शिक्षण विभागाकडून पराग मुंढे यांनी दिल्यानंतर अर्धनग्न आंदोलन स्थगित करण्यात आले. महापालिकेवर स्वत विद्यार्थी विचार मंचचे धम्मराज साळवे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन केले. याप्रसंगी संतोष शिंदे, सतीश कदम यांच्यासह शेकडो आंदोलक सहभागी झाले होते.

### वेळेवर शालेय साहित्य मिळतच नाही...

शहरातील कामगार, कष्टकऱ्यांची मुले महापालिकेच्या बालवाडी, प्राथमिक, माध्यमिक शाळेत शिक्षण घेत आहेत. महापालिकेत सुमारे ५५ हजार विद्यार्थी शिकत आहेत. त्या सर्व विद्यार्थ्यांना मागील २० वर्षांपासून वेळेवर शालेय साहित्य मिळत आहेत. यामध्ये गणवेश, पीटी गणवेश असे विविध साहित्य वेळेवर दिले जाते. मात्र, यंदाचे शैक्षणिक वर्षास प्रारंभ होवून आठवडा झाला, तरी शालेय साहित्य मिळालेले नाहीत. महापालिका शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींना गणवेशाअभावी शाळेत यावे लागत आहे. ही बाब महापालिकेसाठी निंदनीय आहे. महापालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच सर्व विद्यार्थ्यांना वेळेवर शालेय साहित्य मिळालेले नाही. गेल्या कित्येक दिवसापासून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अद्याप मिळालेली नाही. मग डीबीटीचे रक्कम कधी मिळणार?, त्यामुळे महापालिका शाळांमध्ये डीबीटी न राबविता त्यांना शालेय साहित्याचे वाटप करावे, अशी मागणी धम्मराज साळवे यांनी केली.

### मोर्चाकडे सत्ताधाऱ्यांनी फिरविली पाठ

» महानगरपालिकेवर भाजप सत्ता आहे. महापालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच विद्यार्थ्यांना शालेय साहित्याअभावी शाळेत जावे लागत आहे. भाजप पदाधिकाऱ्यांना विद्यार्थ्यांचे गांभिर्य नाही. महापौर राहुल जाधव, सत्तारुढ पक्षनेते एकनाथ पवार, स्थायी समिती सभापती विलास मडेगिरी तसेच आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त संतोष पाटील यांना विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष देण्यास वेळ नाही. या सर्वांचा स्वत विद्यार्थी विचार मंचकडून निषेध करण्यात आला.



### गणवेश ही न्यायालयीन बाब...

» दरम्यान, महापालिका शिक्षण विभागाकडून पराग मुंढे यांनी आंदोलकांची भेट घेतली. आंदोलकांचे मागण्यांचे ऐकून घेतल्या. त्यासंदर्भात आयुक्त व अतिरिक्त आयुक्तांकडे या मागण्या मांडल्या जातील. तसेच येत्या आठ दिवसात शालेय साहित्याचे वाटप करण्यात येईल. याशिवाय गणवेश, पीटी गणवेश आणि स्वेटरबाबत न्यायालयीन बाब झाली आहे. त्यावर वरिष्ठांशी बोलून आपणांस योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आली.

जनशक्ति Thu, 27 June 2019
epaper.ejanshakti.com/c/40776221

# शालेय साहित्यासाठी विद्यार्थ्यांचे अर्धनग्न आंदोलन

## साहित्य वाटपास विलंब : आयुक्तांविरोधात घोषणाबाजी

**। पिंपरी । प्रतिनिधी**

महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपास विलंब झाल्याच्या निषेधार्थ रयत विद्यार्थी विचारमंचाच्या वतीने बुधवारी (दि. २६) विद्यार्थ्यांचे अर्धनग्न आंदोलन करण्यात आले. 'आयुक्त कपड्यावर अन् आम्ही उघड्यावर' अशी घोषणाबाजी करत प्रशासनाचा निषेध करण्यात आला.

महापालिकेवर रयत विद्यार्थी विचारमंचाचे धम्मराज साळवे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन केले. या प्रसंगी संतोष शिंदे, सतीश कदम यांच्यासह शेकडो आंदोलक सहभागी झाले होते. शहरातील कामगार, कष्टकऱ्यांची मुले महापालिकेच्या बालवाडी, प्राथमिक, माध्यमिक शाळेत शिक्षण घेत आहेत. महापालिकेत सुमारे ५५ हजार विद्यार्थी शिकत आहेत. त्या सर्व विद्यार्थ्यांना मागील २० वर्षांपासून वेळेवर शालेय साहित्य मिळत आहे. यामध्ये गणवेश, पीटी गणवेश असे विविध साहित्य वेळेवर दिले जाते. मात्र, यंदाच्या शैक्षणिक वर्षास प्रारंभ होऊन आठवडा झाला तरी शालेय साहित्य मिळालेले नाही.



महापालिका शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींना गणवेशाअभावी शाळेत यावे लागत आहे, ही बाब महापालिकेसाठी निंदनीय आहे. महापालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच सर्व विद्यार्थ्यांना वेळेवर शालेय साहित्य मिळालेले नाही. त्यामुळे शालेय साहित्याचे तातडीने वाटप करावे, अशी मागणी धम्मराज साळवे यांनी केली.

दरम्यान, शिक्षण विभागाचे सहायक प्रशासन अधिकारी पराग मुंढे यांनी आठ दिवसांत साहित्य वाटपाचे आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले.

**दिनांक २७ जून २०१९**

**महापालिकेवर विद्यार्थ्यांचा अर्धनग्न मोर्चा**

विद्यार्थ्यांच्या न्याय हक्कांसाठी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक/अध्यक्ष-धम्मराज साळवे यांच्या नेतृत्वात पिंपरी चिंचवड महापालिकेवर अर्धनग्न मोर्चा काढण्यात आला .या  आंदोलनाची दखल घेतल्याद्दल सर्व पत्रकार बांधवांचे खुप खुप आभार...











## दिनांक ०१ जुलै २०१९
## गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत

मोशी,भोसरी येथील ०३ पालकांनी आर्थिक परिस्थिती सक्षम नसल्यामुळे त्यांनी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेकडे त्यांचा मुलांना संस्थेच्या वतीने शैक्षणिक साहित्य देण्यात यावे यासाठी विनंती केली.म्हणुन मोशी या ठिकाणी जाऊन संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे व महासचिव संतोष शिंदे यांनी त्या विद्यार्थांना शैक्षणिक साहित्य दिले.



**दिनांक ०८ जुलै २०१९**

**महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य तात्काळ मिळावे.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळेत शिकणार्या विद्यार्थांना शाळा चालु होऊन एक महिना झाला तरी शालेय साहित्य,रेनकोट,गणवेश,शुज दिले नाहीत यासाठी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने २७ जुन रोजी महापालिकेवर विद्यार्थांचा अर्धनग्न मोर्चा काढण्यात आला होता.त्यानंतर सहाय्यक प्रशासन शिक्षण अधिकारी पराग मुंडे यांनी १० दिवसात सर्व शालेय साहित्य देण्याचे मान्य केले होते.म्हणुन आज त्याच मागणीची आठवण करून देण्यासाठी संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे सर यांनी मुख्य शिक्षण अधिकारी जोत्सना शिंदे यांची भेट घेतली.यावेळी त्यांनी शैक्षणिक साहित्य देण्याचे आदेश निघाले असल्याचे सांगितले व तात्काळ शालेय साहित्य दिले जाईल असे सांगितले.






## दिनांक १४ जुलै २०१९
## एक शैक्षणिक मदत मृत रिक्षाचालकाच्या मुलांना

गांधीनगर झोपडपट्टी मधील रिक्षाचालक बजरंग माडळकर यांचा हृदय विकाराच्या झटक्याने मृत्यु झाला,घरची परिस्थिति हालाकीची असल्याने सदर कुटुंबाने रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेकडे शैक्षणिक साहित्य व मदतीची विनंती केली यास प्रतिसाद देत करणं आणि करुणा या विद्यार्थ्यांना आवश्यक शालेय साहित्य संस्थेच्या वतीने देण्यात आले व पुढील शिक्षणासाठी मदत करण्याचे आश्वासन दिले. यावेळी संस्थापक अध्यक्ष-धम्मराज साळवे,संघटक रोहित कांबळे,शहराध्यक्ष महेश महेश ऊर्फ जयदादा गायकवाड,अजय शेरखाने उपस्थित होते.





## दिनांक ०२ ऑगस्ट २०१९

## गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ कार्यक्रमाचे निमंत्रण

गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ कार्यक्रमाचे निमंत्रण पत्रिका मा.रंगनाथ उंडे साहेब पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा मा.टोनपे साहेब (वरीष्ठ पोलीस निरीक्षक),मा.राजेंद्र निकाळजे सर (पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा,निगडी) यांना देताना.


विद्यार्थी विचार मंच
महाराष्ट्र राज्य


विद्यार्थी विचार मंच








विद्यार्थी विचार मंच









## दिनांक ०२ ऑगस्ट  २०१९
## गुणवंत विद्यार्थांचा सत्कार समारंभ

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने पिंपरी चिंचवड शहर आयोजित पिं.चिं शहराध्यक्ष महेश गायकवाड व सर्व पदाधिकारी यांच्या वतीने १० वी १२ वी गुणवंत विद्यार्थांचा सत्कार समारंभ बौद्धनगर पिंपरी येथे पार पडला.कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक राजेंद्र निकाळजे सर (पोलिस निरिक्षक गुन्हे शाखा निगडी), तसेच प्रमुख ऊपस्थिती पोलिस उपनिरीक संदेश इंगळे सर कार्यक्रमाचे अध्यक्ष धम्मराज साळवे सर व कार्यक्रमाचे स्वागोत्सुक कार्यध्यक्षा अंजना गायकवाड होत्या महासचिव संतोष शिंदे यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले.यावेळी मान्यवरांनी विद्यार्थांना मार्गदर्शन केले.व गुणवंत विद्यार्थांचा सत्कार सन्मानचिन्ह ,प्रमाणपत्र शैक्षणिक साहित्य देऊन सन्मान करण्यात आला.

# रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**पिंपरी । प्रतिनिधी**

रयत विद्यार्थी विचार मंच (महाराष्ट्र राज्य) संस्थेच्या वतीने पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने बौध्दनगर सिंधी समाज हॉल पिंपरी या ठिकाणी दहावी व बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक राजेंद्र निकाळजे सर पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा निगडी तसेच प्रमुख उपस्थिती पोलीस उपनिरीक्षक संदेश इंगळे सर, कार्यक्रमाच्या स्वागतोत्सुक कार्याध्यक्ष अंजना गायकवाड,कार्यक्रमाचे अध्यक्ष धम्मराज साळवे सर व कार्यक्रमाचे संयोजक पिंपरी चिंचवड अध्यक्ष महेश गायकवाड होते

यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह,प्रमाणपत्र, शैक्षणिक साहित्य व गुलाब पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले.



कार्यक्रमाचे मार्गदर्शक राजेंद्र निकाळजे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले कि पारंपरिक शिक्षण सोडून विद्यार्थ्यांनी कौशल्य प्रशिक्षण घेऊन नोकरीच्या मागे न लागत उद्योग व्यवसायाकडे वळले पाहिजे. पोलीस उपनिरीक्षक संदेश इंगळे सर यांनी स्वताच्या गरिब परिस्थिती चा प्रवास सांगून मी कसा पोलीस झालो हे सांगून विद्यार्थ्यांना एक संदेश दिला कि शिकायची आवड असेल तर परिस्थितीचा बाऊ न करता जिद्दीने शिकले पाहिजे. कार्यक्रमाचे अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी होतकरू विद्यार्थ्यांना आवाहन केले की परिस्थितीमुळे शिक्षण सोडून देऊ नका.रयत विद्यार्थी विचार मंच तुमच्या पाठीशी आहे व आम्हाला जमेल ती शक्य मदत आम्ही सदैव विद्यार्थ्यांना करू असं बोलून विद्यार्थ्यांचं मनोबल वाढवण्याचा प्रयत्न केला.

**दिनांक ०३ ऑगस्ट २०१९**

पुढारी

संक्षिप्त




रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**पिंपरी :** रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेतर्फे पिंपरीतील सिंधी समाज हॉल येथे दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पोलिस निरीक्षक (गुन्हे) राजेंद्र निकाळजे, पोलिस उपनिरीक्षक संदेश इंगळे, संस्थेचे अध्यक्ष धम्मराज साळवे, कार्याध्यक्ष अंजना गायकवाड, महेश गायकवाड, संदेश पिसाळ, नीरज भालेराव, रोहित कांबळे, प्रदीप मस्के, लखन तावरे आदी उपस्थित होते. पारंपरिक शिक्षण सोडून विद्यार्थ्यांनी कौशल्य प्रशिक्षण घेऊन नोकरीच्या मागे न लागता उद्योग व्यवसायाकडे वळावे, असे आवाहन राजेंद्र निकाळजे यांनी केले. गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शैक्षणिक साहित्य व गुलाब पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. संतोष शिंदे यांनी सूत्रसंचालन केले.





दिनांक ११ ऑगस्ट २०१९

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या पुणे शहराध्यपदी मा.करण कांबळे तसेच पुणे उपाध्यक्षपदी लखन तावरे यांची संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे महासचिव संतोष शिंदे व कार्याध्यक्ष अंजना गायकवाड यांच्या उपस्थितीत नियुक्ती करण्यात आली.यावेळी बैठकीत पुण्यातील शैक्षणिक परिस्थितीचा आढावा घेण्यात आला.यावेळी पश्चिम महाराष्ट्रातील पुरजन्य परिस्थिती बद्दल चर्चा करण्यात आली.व यामध्ये सर्वांचे असे एकमत झाले की सांगली सातारा या ठिकाणी सर्व पूरग्रस्तांना लोक व शासन जीवनावश्यक वस्तुंची मोठ्या प्रमाणात मदत करत आहे.त्यामुळे संस्थेच्या वतीने असे ठरवण्यात आले की पुर ओसरल्यानंतर तेथील विद्यार्थांना शैक्षणिक साहित्याची मदत लागेल.त्यावेळेस संस्थेच्या वतीने तेथील विद्यार्थांना शक्य तेवढी शैक्षणिक साहित्येची मदत करण्यात येईल.त्यासाठी समाजातील दानशुर व्यक्तींना आवाहन करून शैक्षणिक साहित्य जमवण्याचे कार्य सुरू करण्यात येईल.


यावेळी पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष महेश गायकवाड,उपाध्यक्ष समाधान गायकवाड व पुणे शहरातील विद्यार्थी युवक उपस्थित होते.








**दिनांक ११ ऑगस्ट २०१९**
कोल्हापूर, सातारा, सांगली पूरग्रस्त विभागासाठी सामान पाठविण्याची तयारी चालू आहे. कोथरूड,भोसरी,पिंपरी येथील दानशुर व्यक्तींकडुन साहित्य जमा केले तसेच सुरत वरून देखील साहित्य आले आहे.









## दिनांक ११ ऑगस्ट २०१९

## पूरग्रस्त विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य जमा

रयत विद्यार्थी विचार मंच पुणे शहराध्यक्ष करण कांबळे व उपाध्यक्ष लखन तावरे हे पुणे शहरात कोल्हापूर व सांगली पुरग्रस्त विद्यार्थांच्या शैक्षणिक मदतीसाठी हे सातत्याने फिरून शैक्षणिक साहित्य जमा करत आहेत...

















**दिनांक १५ ऑगस्ट २०१९**

**स्वातंत्र्यदिन साजरा**

रयत विद्यार्थी विचार मंच मंच महाराष्ट्र राज्य व पिंपरी चिंचवड शहाराच्या वतीने पिंपरी संपर्क कार्यालय येथे ७३ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात पार पडला.संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे सर व कार्याध्यक्ष अंजना गायकवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन करण्यात आले.तसेच लहान मुलांना बिस्कीट वाटप करण्यात आले.तसेच सर्व मान्यवरांचा व पदाधिकार्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी संस्थेचे सर्व पदाधिकारी ऊपस्थित होते.







**दिनांक १५ ऑगस्ट २०१९**

**एक हात पूरग्रस्त विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक मदतीसाठी**

आवाहानाला प्रतिसाद देत कोल्हापुर व सांगली पुरग्रस्त विद्यार्थांच्या मदतीकरता युवा कार्यकर्ते आश्पाक भाई शेख, सुरज बार,भैय्यासाहेब गजधने व आकाश शिंदे व अजय गवळी, वह्या पेन बॉक्स इ.शैक्षणिक साहित्य रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे व महासचिव संतोष शिंदे यांच्याकडे सुपुर्त केले.








## दिनांक २४ ऑगस्ट २०१९
## एक मदत पुरग्रस्तांसाठी

अकिलभाई मुजावर तसेच अंजना गायकवाड,अर्चना परब,रूहीनाज शेख व धम्मराज साळवे,संतोष शिंदे यांनी कोल्हापुर सांगली पुरग्रस्तांसाठी मदतीचे आवाहन केले होते.या आवाहानाला प्रतिसाद देत कोथरूड,सुरत,भोसरी,पिंपरी चिंचवड येथील दानशुर व्यक्तींनी जीवनावश्यक साहित्य खाद्यपदार्थ दिले.लोकांनी दिलेले साहित्य घरोघरी जाऊन जमा करण्यात आले. व हे साहित्य कोल्हापूर सांगली पूरग्रस्तांसाठी पाठवून दिले.





**दिनांक ११ सप्टेंबर २०१९**
**पिंपरी येथील भिमसृष्टी उदघाटन समारंभ**

पिंपरी येथील भिमसृष्टी अतिशय सुंदर आणि बाबासाहेबांच्या कार्याचा ऊजाळा आणाणरी आहे.अश्या या सुंदर भिमसृष्टीचे शिल्पकार महेंद्र थोपटे सर यांचे रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने संस्थापक /अध्यक्ष धम्मराज साळवे सर व महासचिव संतोष शिंदे यांनी त्यांचे आभार मानले.










## दिनांक २९ सप्टेंबर २०१९
## RTE पालक विद्यार्थी मेळावा

रयत विद्यार्थी विचार मंच पुणे शहर आयोजित पुणे शहराध्यक्ष करण कांबळे व ऊपाध्यक्ष लखन तावरे यांच्या नेतृत्वात RTE संदर्भात जनजागृती करण्यासाठी घेण्यात आलेला पालक विद्यार्थी मेळावा यशस्वी पणे संपन्न झाला. यावेळी RTE या विषयावर बोलण्यासाठी समाजसेवक मुकंद किर्दत सर, प्रतिभाताई जाधव, प्राचार्य भारत साबळे सर, ऊद्योजक संतोष देशपांडे, हेमंत ढोरे (ऊद्याजोक) संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे सर, कार्याध्यक्ष अंजना गायकवाड, महासचिव संतोष शिंदे असे अनेक मान्यवर उपस्थित होते, तसेच RTI अंतर्गत १० वी पर्यंत शिक्षण देण्यात यावे यासाठी पाठपुरावा करण्याचा निर्धार करण्यात आला सदर कार्यक्रमात उपाध्यक्ष लखन तावरे, क्रिएटिव्ह सर्व्हिसेस यांनी विशेष सहकार्य केले,









## दिनांक २९ सप्टेंबर २०१९
## दिवाळीचा एक दिवस अनाथ विद्यार्थी मित्रांबरोबर

रयत विद्यार्थी विचार मंच च्या माध्यमातून दिवाळीचा एक दिवस  अनाथ आश्रमातील विद्यार्थी मित्राबरोबर दापोडी येथील सरस्वती आश्रम साजरा करण्यात  आला तरी  यावेळी तेथील विद्यार्थ्यांना दिवाळीचा मिठाई फराळ तसेच शैक्षणिक साहित्य वाटून साजरा केला.










## दिनांक ०६ नोव्हेंबर २०१९

## मावळ तालुका प्रमुख अतुल वाघमारे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा

अतुल अशोक वाघमारे यांच्या वाढदिवसानिमित्ताने आढले बुद्रुक या ठिकाणी आदिवासी भागात गरीब गरजू मुलांबरोबर वाढदिवस खाऊ वाटून केक कापून साजरा करण्यात आला तेथील मुलांचा आनंद द्विगुणित झाला .यावेळी (मा.सरपंच) जयदीप वाघमारे युवा मंच चे सर्व सदस्य उपस्थित होते सतीश वाघमारे, मयुर वघमारे,कुमार वाघमारे, सतीश बाळू वाघमारे, विकास वाघमारे, किरण वाघमारे, कुंदन वाघमारे, योगेश वाघमारे, स्वप्नील वाघमारे,ऋतिक वाघमारे, ऋत्विक वाघमारे, अतिश वाघमारे, तनय वाघमारे, सुनिल सरोदे, राजू भालेराव आदी जन उपस्थित होते...





## दिनांक ०७ नोव्हेंबर 2019
## विद्यार्थी_दिन_साजरा

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने आज बाबासाहेबांचा शाळा प्रवेश दिन म्हणजे विद्यार्थी दिन साजरा करण्यात आला.पिंपरी येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला API बोचरे साहेब व संस्थापक अध्यक्ष व पदाधिकारी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले.यावेळी API बोचरे साहेबांनी पदाधिकारी यांना मार्गदर्शन केले.यावेळी अंजना गायकवाड,संतोष शिंदे,रोहित कांबळे,समाधान गायकवाड,प्रतीक वाघमारे,सौरभ सूर्यवंशी,सुहास,ओंकार रणधीर, प्रणव गायकवाड उपस्थित होते.



# पिंपरीत शाळा प्रवेशदिन साजरा

**पिंपरी, दि. ८ (प्रतिनिधी)** - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ७ नोव्हेंबर रोजी शाळेत प्रवेश केला होता. हा दिवस राज्यभरात शाळा प्रवेश दिन म्हणून साजरा केला जातो. पिंपरीतील रयत विद्यार्थी संघटनेच्या वतीने डॉ. आंबेडकर उद्यानात शनिवारी (दि.७) हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

पिंपरी ठाण्याचे पोलीस उपनिरिक्षक हरिदास बोचरे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर या उद्यानातील संविधान प्रास्ताविकाचे वाचन करण्यात आले.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाचे स्मरण करण्यात आले. याप्रसंगी धम्मराज साळवे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

**पिंपरी : शाळा प्रवेश दिन साजरा करताना पोलीस उपनिरिक्षक हरिदास बोचरे, धम्मराज साळवे व इतर मान्यवर.**

प्रभात Mon, 09 November 2020 https://epaper.eprabhat.net/c/56248770

दिनांक ०९ नोव्हेंबर २०१९



दिनांक १२ नोव्हेंबर २०१९

गुरुनानक जयंतीनिम्मित अभिवादन करताना रयत पदाधिकारी

पुढारी

# उर्दू शाळेतील शिक्षक भरतीसाठी आंदोलन

**पिंपरी : प्रतिनिधी**

उर्दू माध्यमाची रोस्टर तपासणी महापालिका प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे तीन वर्षे रखडली आहे. १४ उर्दू शाळांमध्ये पुरेसे शिक्षक नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. याकडे लक्ष वेधण्यासाठी रयत विद्यार्थी मंच व पिंपरी चिंचवड मुस्लिम विकास परिषदेच्या वतीने सोमवारी (दि. २५) पिंपरी येथे धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

याबाबत आयुक्त श्रावण हर्डीकर यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महापालिका शिक्षण विभागाच्या उर्दू प्राथमिक शाळेमध्ये शिक्षकांची ४५ पदे रिक्त आहेत. तसेच ११ शाळांना मुख्याध्यापक नाहीत. पदवीधर शिक्षकांना पदोन्नती देण्यात आली नाही. उर्दू माध्यमाचे रोस्टर तयार नसल्याचे सांगण्यात येत आहे. मराठी माध्यमांच्या शिक्षकांचे रोस्टर तयार करून घेतले. परंतु उर्दूच्या ८८ शिक्षकांचे रोस्टर तयार झालेले नाही.

नियमित शिक्षक भरती होईपर्यंत मानधनावर तात्पुरते शिक्षक नेमण्याबाबत अनेकदा प्रशासनास विनंती करण्यात आली. मात्र, त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन पदवीधर शिक्षकांना पदोन्नती द्यावी. तसेच नियमित शिक्षक भरती होऊन शिक्षक उपलब्ध होईपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात प्राथमिक शिक्षकांची भरती करावी, अशी मागणी केली आहे.

Pimpri Edition
24 Nov, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

दिनांक २४ नोव्हेंबर २०१९







## दिनांक २५ नोव्हेंबर २०१९

## उर्दू शाळेतील शिक्षक भरती व इतर समस्यांबाबत धरणे आंदोलन

रयत विद्यार्थी विचार मंच व मुस्लिम विकास परिषद यांच्या वतीने पिंपरी चिंचवड शहरातील उर्दू शाळेच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणीक न्याय हक्कासाठी आजपासून बेमुदत धरणे आंदोलन करण्यात आले असून आज दिवसभर महानगरपालिका प्रशासनाने कसल्याही प्रकारची दखल घेतलेली नाही.जोपर्यत विद्यार्थ्यांना न्याय मिळत नाही तोपर्यंत हे आंदोलन असेच चालू राहील.आज या आंदोलनाला विविध सामाजिक संस्थांनी व संघटनांनी पाठिंबा दिला.










## दिनांक २५ नोव्हेंबर २०१९

उर्दू शाळेच्या विविध प्रश्नांकरिता रयत विद्यार्थी विचार मंच व मुस्लिम विकास परिषदचे पिंपरी येथे बेमुदत धरणे आंदोलन चालु असून सदर आंदोलनाची दखल घेत महापौर उषा माई ढोरे,उपमहापौर तुषार हिंगे, स्थायी समिती सभापती विलास मडगेरी,सत्तारूढ पक्षनेते एकनाथ शिंदे यांनी भेट घेऊन चर्चा केली व 10 दिवसात मागण्या पूर्ण करण्याचा निर्णय त्यांनी घेतला.


OPPO A9 2020





पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८
माध्यमिक शिक्षण विभाग,
क्र. माध्य/शि/७/कावि/१५२/२०१९
दिनांक - २६/११/२०१९

प्रति,
मा. संस्थापक / अध्यक्ष
रयत विदयार्थी विचार मंच महाराष्ट्र राज्य


विषय - उर्दू शाळांच्या समस्या बाबत बेमुदत उपोषण व धरणे आंदोलन बाबत.
संदर्भ - १) आपलेकडील दिनांक २५/११/२०१९ रोजीचे पत्र.
२) क्र. माध्य/शि/७/कावि/२१३/२०१६ दिनांक ११/११/२०१६
३) क्र. माध्य/शि/७/कावि/१०९/२०१७ दिनांक २३/०६/२०१७
४) क्र. माध्य/शि/७/कावि/१७६/२०१८ दिनांक १९/१०/२०१८
५) क्र. माध्य/शि/७/कावि/३६/२०१९ दिनांक ०२/०२/२०१९
६) क्र. माध्य/शि/७/कावि/९२/२०१९ दिनांक १०/०६/२०१९
७) क्र. माध्य/शि/७/कावि/११३/२०१९ दिनांक २९/०६/२०१९

महोदय,

आपलेकडील उपरोक्त विषयांकित संदर्भिय पत्र या कार्यालयास प्राप्त झाले असून सदर पत्रामध्ये आपण माध्यमिक शिक्षण विभागातंर्गत कार्यरत असलेल्या ६ उर्दू माध्यम शाळांच्या समस्या बाबत पुर्तता करणेकामी कळविले आहे.

तथापि माध्यमिक शिक्षण विभागामार्फत सुरु केलेल्या १) रूपीनगर २) थेरगांव ३) खराळवाडी ४) लांडेवाडी ५) नेहरूनगर ६) दापोडी या उर्दू शाळांना प्रथम मान्यता मिळणेकामी मा. शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग पुणे जिल्हा परिषद पुणे यांचेकडे माध्य/शि/७/कावि/१५३/२०१६, दिनांक १९/०८/२०१६ अन्वये आवश्यक त्या कागदपत्रांसह नमुद केलेल्या सहा उर्दू माध्यम शाळांना प्रथम मान्यतेसाठी मा. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आले असून सदरचे प्रस्ताव हे मा. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांनी शिफारस करून प्रथम मान्यतेसाठी मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे- १ यांचेकडे पाठविण्यात आलेले होते. परंतू अध्याप त्यांचेकडून प्रथम मान्यता मिळालेली नाही. त्यानंतर पुन्हा सन २०१७ - २०१८ या शैक्षणिक वर्षामध्ये माहे मार्च २०१८ मध्ये मा. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आले असून सदरचे प्रस्ताव हे मा. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांनी शिफारस करून पुन्हा मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे - १ यांचेकडे प्रथम मान्यतेसाठी शिक्षण विभाग, जिल्हा परिषद पुणे यांचे कार्यालयाकडील जावक क्रमांक ३१४३ ते ३१४८ दिनांक ०८/०५/२०१८ अन्वये पाठविण्यात आलेले आहेत. परंतू अध्याप सदर शाळांना प्रथम मान्यता मिळाली नाही. तसेच या कार्यालयाकडील उपरोक्त संदर्भिय पत्र क्रमांक २ व ३ नुसार मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे - १ यांना सहा उर्दू माध्यम शाळेतील इय-ता १० मधील विदयार्थ्यांना सन २०१६ - २०१७ ते २०१८ - २०१९ या शैक्षणिक वर्षामध्ये एस.एस.सी. बोर्ड परिक्षेस बसविणेकामी शिफारस मिळणेकामी पत्र देवून सदर पत्रामध्ये उपरोक्त सहा उर्दू माध्यम शाळांना प्रथम मान्यता न मिळाले बाबत त्यांच्या निदर्शनास आणून दिले आहे. तसे मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे - १ यांचे कार्यालयात समक्ष जावून संबंधित लिपिक यांचेकडे प्रथम मान्यते बाबत माध्यमिक शिक्षण विभागामार्फत वेळोवेळी चौकशी करण्यात आली परंतू अध्याप समाधानकारक उ-तर मिळाले नाही. व मान्यताही मिळाली नाही. त्यानंतर या कार्यालयाकडील उपरोक्त संदर्भिय क्रमांक ४ ते ६ नुसार पत्रव्यवहार केला असून अध्याप त्यांचेकडून प्रथम मान्यता मिळाली नाही. तसेच मा. आयुक्त, सो. पिं.चिं. मनपा यांचेकडील उपरोक्त संदर्भिय पत्र क्रमांक ७ अन्वये मा. आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांना ६ उर्दू माध्यम शाळांना प्रथम मान्यता न मिळाले बाबत कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार मा. शिक्षण सहसंचालक, (प्रशासन, अंदाज व नियोजन) शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक आशिका/१९-२०/माध्य.शा.प्र.मान्य/आस्था/क - १४४/४४९२, दिनांक १९/०७/२०१९ अन्वये विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, जिल्हा - पुणे यांना उर्दू माध्यम शाळांना प्रथम मान्यता मिळणेबाबत प्रस्तावांवर त्वरीत कार्यवाही होणेबाबत कळविले आहे.

Scanned with CamScanner



सबब, मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे - १ यांचेकडून प्रथम मान्यता मिळालेनंतरच माध्यमिक शिक्षण विभागामार्फत लवकरात लवकर ६ उर्दू माध्यम शाळांना युडायस नंबर मिळणेकामी कार्यवाही करण्यात येईल. तसेच कासारवाडी उर्दू माध्यम शाळेपासून पासून ३ कि. मी. चे आत दापोडी व खराळवाडी या दोन उर्दू माध्यमाच्या शाळा असल्याने बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा कायदा सन २००९ निर्णयानुसार कासारवाडी येथे ९ वी व १० वी चे वर्ग सुरू कार्यवाही करण्यात येईल. तसेच संबंधित ६ उर्दू माध्यम शाळेत टेबल खुर्च्या बेंचेस व इतर साहित्यांची पुर्तता करणेकामी मा. सहा. आयुक्त, मध्यवर्ती भांडार विभाग यांचेकडे माध्य/शि/कावि/२०१/२०१९, दिनांक ०५/०७/२०१९ अन्वये लेखी पत्राद्‌वारे मागणी केलेली आहे. व सध्या विदयार्थ्यांना बसणेकामी तात्पुरत्या स्वरूपात सोय केलेली आहे. तसेच ६ उर्दू माध्यम शाळांना १८ घडयाळी तासिका शिक्षक देण्यात आलेले आहेत. तसेच उर्दू माध्यमाच्या आकुर्डी माध्यमिक शाळेमध्ये शिक्षक व मुख्याध्यापकांचे रिक्त पदे नसल्याने पदोन्नतीने शिक्षक व मुख्याध्यापक यांची पदे भरण्याचा प्रश्नच येत नाही. तसेच उर्दू माध्यमाच्या आकुर्डी येथील कायमस्वरूपी शिक्षक ६ उर्दू शाळांना दिल्यास तेथील विदयार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू शकते. तसेच तेथील विदयार्थ्यांची संख्या मोठयाप्रमाणावर आहे.

तरी आपले माहितीसाठी सविनय सादर

आपला विश्वासू
शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

प्रत - मा. आयुक्त, पिं. चिं. मनपा.
२/- आपले माहितीसाठी सविनय सादर

Scanned with CamScanner

## दिनांक २५ नोव्हेंबर २०१९

## उर्दू शाळेतील शिक्षकी भरती व इतर समस्यांबाबत धरणे आंदोलनाला यश

रयत विद्यार्थी विचार मंच आणि मुस्लीम विकास परिषद या संस्थांच्या वतीने २५ नोव्हेंबर व २६ नोव्हेंबर संविधान दिनी उर्दू माध्यमाच्या शाळेतील विविध मागण्यांकरिता बेमुदत धरणे आंदोलन करण्यात आले होते या आंदोलनाची दखल घेत महापौर उषा माई ढोरे ,उपमहापौर तुषार भाऊ हिंगे, स्थायी समिती सभापती विलास मडगेरी,सत्तारूढ पक्ष नेते एकनाथ पवार यांनी आंदोलनकर्त्याची भेट घेऊन समस्या जाणून घेतल्या व तात्काळ कारवाई करून सर्व मागण्या पूर्ण करणार असल्याचे जाहिर केले शिक्षण अधिकारी यांना तात्काळ समस्या सोडवण्याचे आदेश देण्यात आले व सर्व मागण्या मान्य करत असल्याचे लेखी आश्वासन यावेळी उपमहापौर तुषारभाऊ हिंगे,स्थायी समिती सभापती विलास मडगेरी,शिक्षण अधिकारी पराग मुंडे यांनी आंदोलन करते शिष्ठ मंडळाला दिले...हा लढा अखेरपर्यंत सुरू राहणार

पुढारी



स्थायी समितीचे अध्यक्ष विलास मडिगेरी यांना निवेदन देताना अकिल मुजावर, धम्मराज साळवे, अंजना गायकवाड आदी

# रिक्त जागा भरण्याचे रयत विद्यार्थी मंचला आश्वासन

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड महापालिका उर्दू प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील रिक्त जागा भरण्याबरोबरच शिक्षकांची नेमणूक करण्यासह विविध मागण्या पूर्ण केल्या जातील, असे आश्वासन महापालिकेतील सत्ताधाऱ्यांनी रयत विद्यार्थी विचार मंच व मुस्लिक विकास परिषदेच्या कार्यकर्त्यांना दिले. त्यानंतर दोन दिवस सुरू असलेले आंदोलन स्थगित करण्यात आल्याची माहिती मंचच्या वतीने देण्यात आली.

आंदोलनकर्त्यांचे शिष्टमंडळाने महापौर उषा ढोरे, सत्तारुढ पक्षनेते एकनाथ पवार, उपमहापौर तुषार हिंगे, स्थायी समितीचे अध्यक्ष विलास मडिगेरी यांची भेट घेतली. या वेळी त्यांना मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले.

यावेळी धम्मराज साळवे, संतोष शिंदे, अंजना गायकवाड, रोहित कांबळे, महेश गायकवाड, नीरज भालेराव, अकील मुजावर, रौफ कुरेशी, शफी काझी, शब्बीर शेख यावेळी उपस्थित होते. उर्दू शाळेच्या बाबत विविध मागण्यांसाठी रयत विद्यार्थी विचार मंच व मुस्लिम विकास परिषदेच्या वतीने पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात सोमवारी (दि. २५) पासून आंदोलन सुरू करण्यात आले होते.

Pimpri Edition
28 Nov, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

दिनांक २६ नोव्हेंबर २०१९

पुढारी

संक्षिप्त



संविधान दिनाच्या पूर्वसंध्येला पिंपरीतील डॉ. आंबेडकर स्मारक स्थित संविधान प्रतिकृतीसमोर दीपोत्सव करण्यात आला.

## संविधान दिनानिमित्त भीमसृष्टीत दीपोत्सव

**पिंपरी :** भारतीय संविधान दिनाच्या पुर्वसंध्येला दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले. दीपोत्सवात विविध सामाजिक संस्थांनी सहभाग घेतला. संविधानाबाबत जनजागृती व्हावी, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या वेळी संतोष जोगदंड, धम्मराज साळवे, अकिल मुजावर, आनंदा कुदळे, गिरिष वाघमारे, अजिज शेख, सुरेश गायकवाड, अंजना गायकवाड, रौफ कुरेशी, शब्बीर शेख, नादीर बेग, सौरभ सूर्यवंशी, आमिन शेख, मोहतसीन शेख, मेहबूब शेख, आयफाज कुरेशी आदीसह ओबीसी संघर्ष समिती, सम्यक विद्यार्थी आंदोलन, रयत विद्यार्थी विचार मंच, एमआयएम, सावित्रीबाई फुले स्मारक समिती, बहुजन हिताय बहुजन सुखाय सार्वजनिक ग्रंथालय उपस्थित होते. भारतीय राज्यघटनेने सर्वांना समान न्याय दिला आहे. स्वतंत्र्य, समता व बंधुता ही आदर्श तत्वे घालून दिली. त्या तत्वामुळे सर्वसामान्यांना अभिमानाने जगता येत आहे. भारतीय संविधान दिन हा लोकशाहीचा उत्सव आहे. या उत्सव साजरा करण्यासाठीच या दीपोत्सवाचे आयोजन केल्याची माहिती आयोजकांनी दिली.

दिनांक २६ नोव्हेंबर २०१९






**दिनांक २७ नोव्हेंबर २०१९**

संविधान दिनी रयत विद्यार्थी विचार मंच व मुस्लिम विकास परिषद यांच्या वतीने उर्दू शाळेच्या विविध मागण्यांसाठीचे बेमुदत धरणे आंदोलनांला यश आल्यानंतर सर्व टीमच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाला पुष्पहार अर्पण करण्यात आले.





**दिनांक २८ नोव्हेंबर २०१९**

**महात्मा ज्योतिराव फुले स्मृतिदिन**

क्रांतिसूर्य " महात्मा ज्योतिराव फुले " यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करताना रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे,महासचिव संतोष शिंदे,पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष महेश गायकवाड ,सचिव समाधान गायकवाड










## दिनांक २९ नोव्हेंबर २०१९
## दिवाळीचा एक दिवस अनाथ विद्यार्थी मित्रांबरोबर

रयत विद्यार्थी विचार मंच च्या माध्यमातून दिवाळीचा एक दिवस अनाथ आश्रमातील विद्यार्थी मित्राबरोबर दापोडी येथील सरस्वती आश्रम येथे साजरा करण्यात आला तरी यावेळी तेथील विद्यार्थ्यांना दिवाळीचा मिठाई फराळ तसेच शैक्षणिक साहित्य वाटून साजरा केला यावेळी सर्व पदाधिकारी उपस्थित होते.











**दिनांक ०२ डिसेंबर २०१९**

**सन्मान_कार्याचा**

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या माध्यमातून करत असलेल्या शैक्षणिक कार्याची दखल घेत महात्मा फुले यांच्या स्मृतिदिना निमित्त आयोजित कार्यक्रमात संस्थेच्या कार्याची दखल घेत मुंबई जिल्हा_न्यायाधीश सौ. जगदाळे_मॅडम यांच्या हस्ते संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे,महासचिव संतोष शिंदे,कार्याध्यक्ष अंजना गायकवाड यांचा सन्मान करण्यात आला या कार्यक्रमाचे आयोजक प्रदीपजी लोखंडे, विकास जी शिंदे यांचे आभार





## दिनांक ०४ डिसेंबर २०१९

## तलाठी परीक्षा पास झाल्याबद्दल शुभेच्छा

युवा विद्यार्थी मित्र ,रयत विद्यार्थी विचार मंच सदस्य मा.सत्यजित_घाडगे यांची तलाठी परीक्षा पास झाल्याबद्दल रयत विद्यार्थी विचार मंच महाराष्ट्र राज्य संस्थेच्या वतीने त्यांना पुष्पगुच्छ व तसेच भगवान बुद्ध व त्यांचा धम्म हे पुस्तक देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी त्यांचा सन्मान करताना संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे सर महासचिव संतोष शिंदे,राज्य उपाध्यक्ष रोहित कांबळे,राज्य सचिव नीरज भालेराव उपस्थित होते.






## दिनांक ०६ डिसेंबर २०१९

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६३ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने पिंपरी HA येथील बाबासाहेबांच्या पुतळ्याला हार घालून अभिवादन करण्यात आले.तसेच पिंपरी पुतळा येथे आंबेडकरी युवा संघ व fAM यांच्या संयुक्त विद्यमाने 'एक वही , एक पेन अभियान' महापरिनिर्वाण दिनानिमित्त राबवण्यात आले होते.त्यांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने वह्या व पेन देण्यात आले.यावेळी संस्थेचे संस्थापक धम्मराज साळवे सर महासचिव संतोष शिंदे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष महेश गायकवाड सदस्य प्रीतम वाघमारे उपस्थित होते.



## दिनांक ०७ डिसेंबर २०१९

## शालेय आहार/खिचडी बदलणे बाबत निवेदन

महानगरपालिका शाळेमधील मिड - डे मिल ,शालेय पोषण आहार/खिचडी निकृष्ट दर्जाची असल्याने तात्काळ कंत्राट बदलणे व योग्य व आहार उपलब्ध करून देणे संदर्भात रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने शिक्षण मंडळ सभापती मनीषा पवार यांना निवेदन देताना संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे ,महासचिव संतोष शिंदे , कार्याध्यक्षा अंजना गायकवाड,उपाध्यक्ष रोहित कांबळे



पुढारी

# शालेय पोषण आहाराचा ठेका बदलण्याची मागणी

**पिंपरी : प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकाअंतर्गत असलेल्या प्राथमिक हिंदी, इंग्रजी, उर्दू, मराठी माध्यमाच्या सर्व शाळांमध्ये दिल्या जाणाऱ्या शालेय पोषण आहार निकृष्ट दर्जाचा असल्याने शालेय पोषण आहाराचा ठेका बदलावा, अशी मागणी रयत विद्यार्थी मंचच्या वतीने करण्यात आली आहे.

याबाबत शिक्षण समिती सभापती मनिषा पवार यांना दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, शाळांमध्ये देण्यात येणारा शालेय पोषण आहार हा विविध संस्था,बचत गट यांच्या मार्फत तयार केला जातो. या शालेय पोषण आहार निकृष्ट दर्जाचा व अयोग्य असल्यासंदर्भात अनेक तक्रारी वेळोवेळी विद्यार्थी व पालक करत असूनही याकडे दुर्लक्ष केले जात आहे. हा पोषण आहार दर्जेदार नसल्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होत आहे.

खिचडी व आहारात योग्य प्रतीचे धान्य, तांदूळ वापरले जात नाही. योग्य प्रकारे साफ सफाई होत नाही केली जात नाही. खिचडी खाण्यायोग्य नसून त्यात खडे आढळत आहेत. अनेक वेळा विद्यार्थ्यांना विषबाधेच्य समस्या देखील निर्माण झाल्य आहेत. एक निर्णयक्षम अधिकारी म्हणून दररोज वेगवेगळ्या शाळांन भेट देऊन विद्यार्थ्यांसमवेत मध्यान्ह भोजनामध्ये सहभागी व्हावे. यामुळे आहाराचा दर्जा सुधारण्यात मदत होईल व योग्य प्रकारे आहार न तया करणाऱ्या संस्था, बचत गट यांच्याव कारवाई करावी व तत्काळ ठेका र करावा, अशी मागणी केली आहे.

Pimpri Edition
8 Dec, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com



# 'पोषण आहाराचे कंत्राट रद्द करा'

पिंपरी, ता. ८ : महापालिकाअंतर्गत असलेल्या प्राथमिक हिंदी, इंग्रजी, उर्दू, मराठी माध्यमांच्या सर्व शाळांमध्ये शालेय पोषण आहार दिला जातो. पोषण आहार विविध संस्था व बचत गट यांच्यामार्फत पुरविला जातो. हा आहार निकृष्ट दर्जाचा असून, अनेकांच्या तक्रारी येऊनही प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे पोषण आहाराचे कंत्राट रद्द करण्यात यावे, अशी मागणी रयत विद्यार्थी मंचच्या वतीने करण्यात आली आहे.

पोषण आहार पोषक नसून विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी धोका केला जात आहे. खिचडी व आहारात योग्य प्रतीचे धान्य, तांदूळ वापरले जात नाही. योग्य प्रकारे साफसफाई होत नाही. परिणामी, अनेकदा विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे पोषण आहार पुरविणाऱ्या संस्था व बचत गट यांच्यावर कारवाई करावी व कंत्राट रद्द करावे, अशी मागणी रयत मंचचे अध्यक्ष धम्मराज साळवे, महासचिव संतोष शिंदे, कार्याध्यक्ष अंजना गायकवाड, उपाध्यक्ष रोहित कांबळे यांनी केली आहे.

दिनांक ०८ डिसेंबर २०१९







## दिनांक १९ डिसेंबर २०१९

**CAA & NRC ,जामिया विद्यापीठातील विद्यार्थ्यांवरील पोलीसी अन्याया विरुद्ध..मार्गदर्शक मानवजी कांबळे सर यांच्या नेतृत्वाखाली. आम्ही मैदानात...!**

जामिया विद्यापिठाच्या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी जो अमानुषपणे अत्याचार केला,त्याचा निषेध करण्यासाठी संविधान प्रेमी संघटना च्या वतीने रयत विद्यार्थी विचार मंच च्या माध्यमातून संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी निषेध केला , महासचिव संतोष शिंदे,उपाध्यक्ष रोहित कांबळे, सचिव नीरज भालेराव, प्रतीक वाघमारे हे सहभागी होते.

सकाळ

# विद्यार्थ्यांवरील अत्याचाराचा निषेध

## पिंपरीतील विविध समविचारी संस्था, संघटनांकडून आंदोलन

**पिंपरी, ता. १८ :** दिल्लीतील जामिया विद्यापीठातील विद्यार्थ्यांवर पोलिसांनी केलेल्या लाठीमाराच्या निषेधार्थ 'फॅसिझम मुर्दाबाद'चा नारा देत शहरातील समविचारी संघटना एकत्रित येत बुधवारी (ता. १८) रस्त्यावर उतरल्या. आंदोलनकर्त्यांनी 'नही चलेगी, नही चलेगी, मोदी सरकार की दादागिरी नही चलेगी,' 'एनआरसी हटाओ, देश बचाओ' ''मोदीजी होश आओ' अशा घोषणा देत हल्लाबोल केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर नागरी हक्क सुरक्षा समितीचे अध्यक्ष मानव कांबळे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलनकर्त्यांनी मोदी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. यात सम्यक विद्यार्थी आंदोलनचे संतोष जोगदंड, रयत विद्यार्थी मंचचे धम्मराज साळवे, ओबीसी संघर्ष समितीचे आनंद कुदळे, बारा बुलतेदार संघाचे प्रताप गुरव, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संजय बारी, वंचित आघाडीचे सुरेश गायकवाड, वडार सेवासंघाचे प्रदीप पवार, समता परिषदेचे चंद्रशेखर भुजबळ, सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर, गिरीश वाघमारे, मोहन अडसूळ, विलास गव्हाणे, एमआयएमचे अकील मुजावर, युवक काँग्रेसचे नरेंद्र बनसोडे, क्रांती महासंघाचे काशिनाथ नखाते, शिवशंकर उबाळे, सुनील कांबळे आदींनी आंदोलनात सहभाग घेतला.

कांबळे म्हणाले, ''मोदी व शहांकडून ठराविक समाजाला टार्गेट केले जात आहे. हे लोकशाहीला मारक आहे. अन्यायाविरोधात आवाज उठविणाऱ्यांना दाबण्याचे काम सरकार करत आहे. या हिटलरशाहीविरोधात सगळ्यांनी एकत्र येऊन लढा देण्याची गरज निर्माण झाली आहे.'' कबीर कला मंचचे सागर गोरखे, विशाल भालेराव, दत्ता मरळीकर व सहकाऱ्यांनी पोवाड्याच्या माध्यमातून मोदी सरकारवर सडकून टीका केली. त्यांनी 'बनाके कायदा एनआरसी का छीन रहा रहा है देशभक्ती', 'स्वातंत्र्य, समता, बंधुभाव नाही, असे एकाहून अधिक पोवाडा सादर करून मोदी-शहा यांच्या तानाशाहीवर हल्लाबोल केला.



**पिंपरी चौक : जामिया विद्यापीठातील विद्यार्थ्यांवर झालेल्या अन्यायाविरोधात शहरातील विविध संघटनांनी निषेध आंदोलन केले.**

पुढारी

# जेएनयू हल्ल्याच्या निषेधार्थ पिंपरीत निदर्शने

**पिंपरी : प्रतिनिधी**

जेएनयू विद्यापीठातील विद्यार्थी, शिक्षक तसेच ज्येष्ठ नेते योगेंद्र यादव यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ मंगळवारी (दि.७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात विविध पुरोगामी संघटनांच्या वतीने निदर्शने करण्यात आली. फॅसिझम मुर्दाबादच्या घोषणा या वेळी देण्यात आल्या.

नागरी हक्क सुरक्षा समितीचे अध्यक्ष मानव कांबळे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या निदर्शने आंदोलनात सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर, डॉ. सुरेश बेरी, ओबीसी संघर्ष समितीचे प्रताप गुरव, आनंदा कुदळे, सुरेश गायकवाड, संभाजी ब्रिगेडचे सतीश काळे, वैभव जाधव, रयत विद्यार्थी मंचचे धम्मराज साळवे, सम्यक विद्यार्थी आंदोलनचे संतोष जोगदंड, गिरीश वाघमारे आदी कार्यकर्ते सहभागी झाले होते.




**जेएनयू विद्यापीठातील विद्यार्थ्यांवर झालेल्या हल्ल्याचा निषेधार्थ पिंपरीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे आंदोलन करण्यात आले.**

या वेळी मानव कांबळे म्हणाले की, विद्यार्थ्यांवर हल्ले होत आहेतच. पण या विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहणाऱ्या योगेंद्र यादव यांच्यासारख्या नेत्यांवरही हल्ले होणार असतील तर ते अतिशय दुर्दैव आहे. दहशत माजविण्याचा हा प्रयत्न लोकशाहीला घातक आहे. त्यामुळेच या प्रकाराच्या विरोधात देशभर विद्यार्थी रस्त्यावर येत आहेत. विद्यार्थी सत्तापालट घडवू शकतात, हे १९७४ च्या नवनिर्माण आंदोलनाने दाखवून दिले होते हे कोणीही विसरू नये, असा इशारा त्यांनी दिला.

Pimpri Edition
8 Jan, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com






## दिनांक २५ डिसेंबर २०१९
## देहूरोड धम्मभूमी वर्धापन दिन

देहूरोड धम्मभूमी वर्धापन दिनानिमित्त युवारत्न सेवा समिती महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष सचिन वाघमारे यांच्या वतीने देहूरोड या ठिकाणी दरवर्षी प्रबोधनपर कार्यक्रम राबवले जातात.यावर्षी देखील प्रबोधनपर व्याख्यान व भीमगीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.यावेळी त्यांनी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे सर व माझा सन्मान केला.यावेळी महाराष्ट्राचे युवा गायक चेतन लोखंडे यांची देखील भेट झाली.





## दिनांक २७ डिसेंबर २०१९

## वायसीएम मधील विविध पदांची परीक्षा रद्द झाल्याने गैरसोय

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालया YCM हॉस्पिटलमध्ये विविध पदाकरिता महाराष्ट्र राज्य विविध जिल्ह्यातील विद्यार्थी परीक्षा देण्यासाठी शेकडो विद्यार्थी आले होते . YCMH विभागाने सदर आज होणारी परीक्षा रद्द करून पुढे ढकलण्यात आली या मुळे आलेल्या विद्यार्थ्यांना अडचणी निर्माण झाल्याने रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे सर यांना अनेक विद्यार्थी मित्रांनी कॉल करून बोलवून घेतले त्यांची दखल घेण्यासाठी YCMH आणि महानगर पालिका यांच्याशी संपर्क करून विध्यार्थ्यांच्या समस्यांना वाचा फोडली यामुळे YCMH अधिकारी यांनी सहकार्य करण्याचे मान्य केले.

पुढारी

# 'वायसीएम'मधील विविध पदांची परीक्षा रद्द

## बाहेरगावाहून आलेल्या परीक्षार्थ्यांची गैरसोय

**पिंपरी : प्रतिनिधी**

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील (वायसीएम) विविध पदांसाठी २७ डिसेंबरची नियोजित लेखी परिक्षा रद्द करण्यात आली. ९७ पदांसाठी साडे तीन हजार अर्ज प्राप्त झाले होते. अर्जांची पात्र व अपात्र ही यादी न बनविण्यात आल्याने ही परिक्षा रद्द करण्यात आल्याच्या प्रशासनाकडून सांगण्यात आले. त्यामुळे पुणे जिल्ह्यासह मराठवाडा, विदर्भातून आलेल्या विद्यार्थ्यांची गैरसोय झाली. परीक्षार्थींमधून तीव्र संताप व्यक्त केला जात होता.

वायसीएममध्ये विविध रिक्त पदे भरण्यासाठी महापालिकेच्या संकेतस्थळावर सविस्तर जाहिरात प्रसिद्ध केली होती. स्टाफ नर्स, डायलेसिस टेक्निशिअन, फार्मासिस्ट, एक्स-रे टेक्निशिअन, ब्लड बँक कौन्सिलर, ब्लड बँक टेक्निशिअन, डाटा एंट्री ऑपरेटर, एमएसडब्ल्यु, लॅब टेक्निशिअन, स्त्री कक्ष मदतनीस, पुरूष कक्ष मदतनीस आदी पदांसाठी अर्ज मागविण्यात आले होते. या पदांसाठी शुक्रवारी (दि. २७) लेखी परीक्षा आयोजित केली होती. मात्र परीक्षा रद्द झाल्याची नोटीस रुग्णालया प्रशासनाने लावली होती. अधिक अर्ज प्राप्त झाल्याने परीक्षा नंतर घेण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. परीक्षेसाठी मराठवाडा, विदर्भासह राज्यभरातून परीक्षार्थी दाखल झाले होते. परीक्षा रद्द करण्यापूर्वी आम्हाला का कळविले नाही, असा संतप्त सवाल उपस्थित करत त्यांनी आजच परीक्षा घेण्याचा आग्रह धरला. मात्र थोड्या लोकांची परीक्षा घेता येणार नसल्याचे रुग्णालय प्रशासनाकडून सांगण्यात आले. विद्यार्थ्यांना दिवसभर उपाशी रहावे लागले. राहण्याची गैरसोय झाली. या बरोबरच पुन्हा हेलपाटे मारावे लागणार असल्याने त्यांच्यामधून संताप व्यक्त केला जात होता.



परीक्षा रद्द झाल्याचे कळताच विद्यार्थ्यांनी संताप व्यक्त करत रुग्णालयासमोर धरणे धरले. रयत विद्यार्थी विचारमंचच्या वतीने विद्यार्थ्यांशी चर्चा करताना धम्मराज साळवे आदी.

> परीक्षार्थींना परीक्षा रद्द झाल्याचे वेळेवर कळवले नाही. रुग्णालयाच्या या गलथान कारभाराचा आलेल्या परीक्षार्थींना त्रास सहन करावा लागला. मराठवाडा व विदर्भातून आलेल्यांची गैरसोय झाली. संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी.
>
> - **धम्मराज साळवे,** अध्यक्ष रयत विद्यार्थी विचार मंच.

> एकूण ९७ जागांसाठी साडेतीन हजार अर्ज महापालिका प्रशासनास प्राप्त झाले होते. अर्जांची संख्या अधिक असल्याने पात्र व अपात्र विद्यार्थ्यांची यादी तयार करून ती संकेतस्थळावर प्रसिद्ध करायचे काम चालू होते. त्यामुळे परीक्षा रद्द झाल्याची सूचना २४ डिसेंबर रोजी संकेतस्थळावर दिल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाकडून देण्यात आली. पात्र व अपात्र यादी बनविण्यात येणार आहे. ती यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यानंतर संबंधितांना लेखी परीक्षेबाबत कळविण्यात येईल.
>
> - **डॉ. राजेश वाबळे,** अधिष्ठता, पीजी महाविद्यालय.

My Pimpri Edition
28 Dec, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

दिनांक २८ डिसेंबर २०१९


Thank you